जाहिरात नमुना

**उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान**

**जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष-उस्मानाबाद**

**प्रशिक्षण केंद्र निवडीबाबत**

दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यात उमेद- महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आलेली आहे. या अभियानाची अंमलबजावणी जिल्हास्तरावर जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्षामार्फत करण्यात येते. जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष, उस्मानाबाद अंतर्गत भूम, परंडा, वाशी, कळंब, लोहारा, तुळजापूर, उस्मानाबाद व उमरगा येथे स्वयंसहाय्यता गटासाठी तसेच ग्रामसंघांसाठी विविध निवासी व अनिवासी प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते. त्याकरिता त्यांची निवास व्यवस्था, सुसज्ज प्रशिक्षण सभागृह व भोजन व्यवस्था असलेल्या प्रशिक्षण केंद्राचे दर निश्चित करून एका वर्षाकरिता करार करणे आहे. तरी इच्छुक संस्थांनी / सेवा पुरवठादर यांनी खाली नमूद केलेल्या पत्त्यावर किंवा संकेतस्थळावर अर्जाचा नमुना प्राप्त करावा. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दि. ३१ / ०४ / २०१८ वेळ दुपारी ३.०० वाजेपर्यंत आहे. अर्जाच्या छाननी नंतर प्रत्यक्ष जागेची पाहणी करून महिलाच्या प्रशिक्षणासाठी योग्य असणाऱ्या व अभियानाच्या इतर अटी व शर्तींनुसार असलेल्या प्रशिक्षण केंद्र / मंगलकार्यालय / हॉटेल या सेवा पुरवठादारांची यादी निश्चित करून त्यांच्याकडून निविदा मागविण्यात येतील. सेवा पुरवठादरांची यादी निश्चित करण्याचे अधिकार अभियानाने राखून ठेवले आहेत. अर्ज सादर करण्याच्या मुदतीत बदल झाल्यास त्याबाबतची सूचना_www.osmanabad.nic.in या संकेत स्थळावर व या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी सेवा पुरवठादर यांच्याकडून कोणतेही निविदा शुल्क व EMD रक्कम घेण्यात येणार नाही

जिल्हा अभियान संचालक,
म. रा. ग्रा. जि. अभियान तथा
मुख्य कार्यकरी अधिकारी,
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

पत्ता - जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष,
जुनी जिल्हा परिषद इमारत, पहिला मजला,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाच्या वर
उस्मानाबाद